CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol II, 26 April 2018
UGC Approved Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143

# वंचितांचा इतिहास लेखन प्रवाह

प्रा.डॉ. दुधभाते फुलचंद सुर्यभान
*जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य , महाविद्यालय, अणदूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद*

--------- (10) ---------

**प्रस्तावना :-**

इतिहासाची जशी व्याप्ती वाढत गेली त्या प्रमाणात इतिहास लेखन समृदध होत गेले, त्यामुळे त्यामध्ये नवनवीन विचार प्रवाह , संप्रदाय दृष्टीकोन निर्माण होत गेले. इतिहासाच्या प्रत्येक कालखंडात मानवाने जिज्ञासेपोटी स्वत: संबंधीत जाणण्याचा प्रयत्न केला. काळाच्या ओघात इतिहासलेखनाच्या क्षेत्रात विविध दृष्टीकोनातून लेखन झाले. प्रारंभीच्या धर्मशास्त्रीय लेखन प्रवाहापासून सद्यस्थितीचा सबाल्टर्न लेखनप्रवाहाचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. सुरुवातीच्या काळात इतिहास लेखन वरच्या स्तरावरुन झाले आहे. जो सर्वसामान्य माणूस इतिहासापासुन दुर होता. त्याची आता इतिहासामध्ये नोंद होऊ लागली आहे.

**उद्दिष्टे -** वंचितांचे इतिहासलेखन जाणुन घेणे

**माहिती संकलन -** प्राथमिक व दुय्यम साधनाच्या अधारे

**विषय विवेचन- सबाल्र्टन -** विविध साधनांच्या आधारे इतिहास लेखन केले जाते. हे इतिहास लेखन करणारी व्यक्ती ती निर्मिती असते. ही व्यक्ती कोणत्या तरी युगाची प्रतिनिधी असते. या प्रतिनिधीत्वाची छाप तिच्या निर्मितीवर उमटलेली असते. इतिहास ही भूतकाळाची कहाणी असली तरी वर्तमानाची गरज असते.

इतिहास लेखन हे दीर्घकाळ चालणारी शोधयात्रा आहे. म्हणूनच कोणतेही इतिहास लेखन हा त्या संदर्भातला अंतिम शब्द नसतो. कोणतेही इतिहास लेखन परिपूर्ण नसते. कारण अलीकडच्या काळामध्ये सबाल्टर्न इतिहास या नावाचा नवीन प्रवाह उदयास आला आहे.

मार्क्सवादी दृष्टीकोनातून सुरु झालेल्या अभ्यास वंचितांच्या इतिहासाचा शोध घेणाऱ्या सबाल्टर्न दृष्टीकोनात विस्तारीत झाला. इटालियन तत्वज्ञ अँटोनीओ ग्रामची याने सबाल्टर्न ही संज्ञा पुढे आणली. सबाल्टर्न शब्दाचा शब्दकोषीय अर्थ कनिष्ठ दर्जाचे कमी किंवा दुय्यम दर्जाचे असा आहे. तसेच वंचित असाही प्रतिशब्द वापरला जातो. अँटोनिओ ग्रामचीने सबाल्टर्न किंवा वंचिता च्या इतिहाससंबंधी संकल्पना मांडली आहे. इतिहासातील अभिजनावाद विरुध्दची प्रतिक्रिया म्हणजे सबाल्टर्न विचार होय. ग्रामचीच्या मते सबाल्टर्न वंर्गास निसर्गदत अधिकारापासून दुर ठेवले जाते. त्यांना अधिकार वापरण्याचे स्वातंत्र्य नसते.

भारतात डॉ. रणजित गुहा यानी 'सबाल्टर्न स्टडिज' या प्रकल्पाच्या माध्यमातून वंचीताचा इतिहास म्हणून एक स्वतंत्र लेखन प्रवाह रुढ केला. समाजाच्या तळागाळातील माहिती करुन घेतल्याशिवाय तत्कालीन इतिहासाचे सम्यकज्ञान, दर्शन होणार नाही ही धारणां विचार सरणीच्या मागे आहे.

**अॅटोनिओ ग्रामची व त्याचा प्रभुत्वाचा सिध्दांत :-**

मार्क्सवादी विचारवंत म्हणून खरे तर अँटोनिओ ग्रामची याची ओळख आहे. इटाली मधील कामगाराच्या लढ्याचे नेतृत्व त्याने केले तसेच हुकूमशाही विरुध्द लेखन केल्यामुळे इटालीचा प्रमुख याने ग्रामची यास तुरुगांतही टाकले होते. तुंरुगात असताना केलेल्या चिंतनातून सबाल्टर्न इतिहास लेखनाचा प्रवाह निर्माण झाला. ग्रामची याने मार्क्सने मांडलेल्या सिध्दांताचा जागतिक परिस्थितीच्या संदर्भात नवीन अर्थ लावला. त्यांच्या मते अर्थिक व्यवहार सामाजिक जीवनाला अधारभूत असले तरी


Copyright © Shaurya Publication, Latur | www.rjorunals.co.in | Email-hitechresearch11@gmail.com

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

सांस्कृतिक बाबीही तितक्याच महत्वाच्या असतात. एवढेच नव्हे तर संस्कृती ही सामाजिक परिवर्तनाला गती देते व दिशा ही देते 'ग्रामचीने सबाल्टर्न' ही संज्ञा व सबाल्टर्निझम हा विचार मांडला आणि त्याला एक वैचारीक व तात्वीक बैठक दिली. सबाल्टर्न हा शब्द सैन्यात उच्च अधिकाऱ्यास सहाय्य करणाऱ्या दुय्यम अधिकाऱ्यासाठी वापरला जातो. लढाईतला विजय सेनापतीच्या नावे नोंदविला जातो. पण ते त्याचे एकट्याचे श्रेय नसते, हा विजय प्रत्यक्ष रणभूमीवर लढणाऱ्या सामान्य सैनिकाचाही असतो. या दुर्लक्षीत गटाला (दुय्यम गटाला) केंद्रस्थानी आणून इतिहासाचा अभ्यास केला जावा असे ग्रामचीचे मत आहे. तसेच लढाईप्रमाणेच विविध चळवळीत सामूहिक कार्यात, उठावात अनेकांचा सामान्याचा सहभाग असतो, परंतू यशाच्या श्रेयनामावलीत या सामान्याना स्थान मिळत नाही, अशा दुर्लक्षीत तळागाळाच्या समाज घटकाचा अभ्यास महत्वाचा आहे, असे ग्रामचीने पटवून दिले आहे.

**सबाल्टर्न इतिहास लेखनाचे स्वरुप :-**

समाजाच्या निम्न स्तरावरील गटांना त्यांच्या इतिहासातील योग्य त्या स्थानापासून इतिहासाने वंचित ठेवले आहे. ही उणीव भरुन काढणे हे सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

इतिहास लेखनात शेतकरी, कामगार, महिला इ. वंचित, शोषित गटाच्या कार्याचा उल्लेख फक्त पुरेसा नसून त्या कार्यामागील त्यांच्या प्रेरणा, मूल्ये, अनुभव व जीवन पध्दतीचा चिकीत्सकपणे विचार आवश्यक आहे. त्याशिवाय खरा इतिहास आमच्या समोर येणार नाही.

पारंपारिक इतिहास लेखनाचे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की, त्यात वास्तव्याचे कुठेही दर्शन घडत नाही. दानेहय लेखनामध्ये समाजातील सर्व घटकांचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही.

सबाल्टर्न किंवा वंचित हेच इतिहासचे कर्ते आहेत. कारण कोणत्याही चळवळीमध्ये जनसमूदायाचा सहभाग महत्वाचा असतो. त्याशिवाय ती चळवळ व्यापक ठरु शकत नाही. परंतू आतापर्यंतच्या इतिहास लेखनात सर्वसामान्यांच्या कार्याची, सहभागाची नोंद झाल्याचे दिसून येत नाही. परंतू सर्वसामान्य गटाला समोर ठेवून इतिहास लेखन करणे हे सबाल्टर्न इतिहास लेखनाचा मुख्य हेतू आहे.

**डॉ. रणजित गुहा आणि वंचिताचा अभ्यास :-**

डॉ. गुन्हा यांच्या मते, कांही इतिहासकारांनी शेतकरी, कामगार, महिला इ. गटाच्या सहभागाचा निर्देश लिखानात केला असला तरी त्यांच्या चळवळीतील स्थान, स्वतंत्र विचारशक्ती व अंतःप्रेरणा नसलेल्या, नेत्यांच्या पाठोपाठ आंधळेपणाने जाणाऱ्या मेंढराच्या कळपासारखे आहे. यातून वास्तव इतिहास दर्शन होत नाही. डॉ. गुन्हा यांच्या लेखनाप्रमाणचे डॉ. शहीद अमीन, डॉ. सुमीत सरकार, पार्थ चटर्जी, ग्यान पांडे, गायत्री चक्रवर्ती रामचंद्र गुहा इत्यादी इतिहासकारानी इतिहास लेखनाच्या क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे सबाल्टर्न स्टडीज हा प्रवाह समृध्द बनला आहे.

**सारांश :-**

सबाल्टर्न इतिहास लेखन हा पूर्णतः वेगळा असा लेखन प्रवाह आहे. कार्ल मार्क्सच्या सिध्दांतचा ग्रानचीने बदलेल्या जागतिक परिस्थितीत नव्याने अर्थ लावला व तुलनेने दुय्यम गट म्हणुन दुर्लक्ष झालेल्या गटाच्या सहभागाची, योगदानाची दखल घेण्यास भाग पाडण्याचे कार्य या प्रवाहाने केले. ग्रामचीच्या लेखनाचा प्रभाव डॉ. रणजीत गुहावर पडलेला असून त्यानीच भारतात हा लेखन प्रवाह रुढ केला. सबाल्टर्न इतिहास लेखनाने समूहामध्ये संस्कृतीचे सार दाखविण्याचा प्रयत्न केला वर्ग संकल्पनेला थारा न देता सत्ताधारी व वंचित वर्ग असे दोन वर्ग मानले. वर्चस्वाचा सांस्कृतिक अर्थ लावला जाऊन त्याचा



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

सामाजिक, अर्थिक बाबीशी परस्पर संबंध शोधणे बाजूला पडले. या लेखन प्रवाहाने दुर्लक्षित समाज गटाप्रमाणे दुर्लक्षित विषयानाही स्थान मिळाले.

संदर्भ :-

- कार ई.एच. इतिहास म्हणजे काय - काँटीनेंटल प्रकाशन पुणे.
- कोठेकर शांता - इतिहास - तंत्र आणि तत्वज्ञान - श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर २००५.
- गर्गे स.मा. - इतिहासाची साधने - एक शोधयात्रा - पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९९४.
- देव प्रभाकर - इतिहास एक शास्त्र - कल्पना प्रकाशन, नांदेड २००२.
- पवार जयसिंगराव - आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध - सुमेरु प्रकाशन डोंबिवली २००४.
- सरदेसाई बी.एन. - इतिहास लेखन पध्दती - फडके प्रकाशन कोल्हापूर २००४.
- आठवले सदाशिव - इतिहासाचे तत्वदान, प्रज्ञा पाठशाला, वाई
- राजदेरकर सुहास - इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन नागपूर १९९८.
- मोरवंचीकर रा.श्री. - इतिहास लेखनशास्त्र व इतिहासकार विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद १९९९.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

Copyright © Shaurya Publication, Latur 